## लसीकरण सत्राचा दिवस

बाळाला लसीकरण केंद्रात घेऊन जा, लसीकरण कार्ड तुमच्या सोबत ठेवा. एक फोटोसह ओळखपत्रही सोबत ठेवा, यामुळे मुलाचे नाव U-WIN मध्ये नोंदविणे सोपे होईल

बाळाचे लसीकरण करा आणि तेथे ३० मिनिटे थांबा, आवश्यक असल्यास लसीकरणानंतर आई बाळाला स्तनपान करु शकते.

लक्षात ठेवा किरकोळ सर्दी खोकला किंवा तापामध्येही लस दिली जाऊ शकते

## लसीकरण सत्रानंतर

लसीकरण कार्ड सुरक्षित ठेवा, पुढील लसीकरणाच्या तारखेची नोंद करा

लसीकरणानंतर मुलाची काळजी, आणि पुढील लसीकरणासाठी कधी यायचे, याविषयी आरोग्य सेविकेला विचारा

जर लसीकरणानंतर मुलाला ताप किंवा चिडचिड होत असल्यास काळजी करु नका, आरोग्य सेविकेच्या सल्ल्यानुसार काळजी घ्या किंवा 'आशा'शी संपर्क साधा. तापासाठी, आरोग्य सेविकेद्वारे दिलेले पॅरासिटामॉल सिरप द्या

इतर पालकांना त्यांच्या मुलाचे लसीकरण करण्यासाठी प्रोत्साहित करा

**सोशल मीडियावर उपलब्ध असलेली लसीकरणासंदर्भातील सर्व माहिती सत्य असेलच असे नाही, म्हणूनच भारत सरकार आणि राज्य सरकार यासारख्या विश्वसनीय स्त्रोतांकडून प्राप्त झालेल्या पोस्टवरच विश्वास ठेवा आणि फॉरवर्ड करा.**

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार



# बालकाच्या लसीकरणाला सर्वप्रथम प्राधान्य देऊया! नजीकच्या लसीकरण केंद्रावर आपल्या बालकाचे ५ वर्षापर्यंतचे लसीकरण करून घेऊया!

मिशन इंद्रधनुष्य ५.0

सुजाण व कर्तव्यदक्ष व्हा!

आपल्या बालकाचे संपूर्ण लसीकरण करून घ्या!

**सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन**

**मिशन इंद्रधनुष्य ५.०** हा नियमित लसीकरणापासून वंचित राहिलेल्या मुलांना राहिलेल्या सर्व लसी देणे आणि आणि गोवर-रुबेला सारख्या आजारांपासून देश मुक्त करण्याचा एक मोठा प्रयत्न आहे. या मोहिमेत काही लसी राहिलेल्या गरोदर महिला आणि पाच वर्षापर्यंतच्या बालकांचे लसीकरण पूर्ण करण्यासाठी आपल्या परिसरात विशेष लसीकरण सत्र आयोजित केले जाईल. तुमच्या मुलाचे डिजिटल एमसीपी कार्ड तयार केले जाईल.

**७-१२ ऑगस्ट** | **११-१६ सप्टेंबर** | **९-१४ ऑक्टोबर**

**२०२३**



## सुदृढ बालक, आनंदी कुटुंब

## लसीकरणाचे सत्य

लसी सुरक्षित असतात आणि मुलांना आजारांपासून वाचवतात

सरकारी केंद्रांमध्ये उच्च गुणवत्तेच्या लसीकरण सेवा मोफत उपलब्ध आहे



## गावात किंवा गावाबाहेर आपण असलेल्या लसीकरण सत्रात आपल्या बाळाचे लसीकरण निश्चित करा !

- तुमच्या पाच वर्षापर्यंतच्या मुलाचे लसीकरण करण्यासाठी जवळच्या आरोग्य कर्मचाऱ्याशी संपर्क साधा
- U-WIN वर प्रत्येक मुलाच्या लसीकरणाची सविस्तर माहिती ठेवली जाते. भारतात कुठूनही तुम्ही ती मिळवू शकता. नोंदणीकृत मोबाइल फोन नंबरवर पुढील लसीकरणासाठी आठवण करून देण्यासाठी नियमित संदेश देखील पाठवेल, तुम्ही कुठेही असलात तरीही
- जर तुम्ही तुमच्या कुटुंबापासून दूर असाल, तर त्यांना ताबडतोब फोन करा, त्यांना तुमच्या बाळाच्या लसीकरणाविषयी विचारा आणि आठवण करून द्या.
- तुम्ही तुमच्या मुलाच्या प्रत्येक लसीसाठी U-WIN पोर्टलद्वारे स्वतःची संपूर्ण नोंदणी करु शकता. हे काम आरोग्य कर्मचारी किंवा आरोग्य सेविकेच्या मदतीनेही करता येते.
- तुमच्या कुटुंबाला पाच वर्षांखालील सर्व मुलांचे लसीकरण करण्यास सांगा

## लसीकरण – समजदार निर्णय

**भविष्यातील तुमचा वेळ आणि पैसा वाचविण्यासाठी आज थोडा वेळ काढा**

१ ज्या मुलांचे संपूर्ण लसीकरण झालेले असते ते मोठे झाल्यानंतर निरोगी नागरीक होतात

२ त्यांचा मानसिक आणि शारीरिक विकासही चांगला होतो, परिणामी ते शाळेत तसेच खेळात चांगले यश मिळवतात

३ मोठे झाल्यानंतर ते चांगले काम करू शकतात आणि म्हणूनच चांगले कमावूही शकतात

**जर तुमच्या मनात लसीकरणाशी संबंधित काही प्रश्न असतील, तर नजीकच्या आरोग्य कर्मचाऱ्याला विचारा**